दिनांक ०९/०९/२०१९

**प्रेसनोट**

**(मुलगी दाखवतो या बहान्याने लुटणा-या टोळीचा करमाळा पोलीसांकडून पर्दा फाश)**

करमाळा पोलीस ठाणे हददीत दिनांक २३/०७/१९ रोजी साडे शिवारात कॅनल लगत फिर्यादी नामे विनायक चौघुले यांना नवरी मिळे नव-याला या वेब साईटवरुन त्यांना संपर्क करुन त्यांना विश्वासात घेवून माझे बहीणीचे तुमच्या सोबत लग्न करायचे असे सांगून विश्वासात घेवून बोलावून घेवून त्याच्याकडून व त्यांच्या घरच्यांकडून रोख रक्कम, सोन व मोबाईल असे मारहाण करुन जबरदस्तीने लुटुन नेले म्हणून करमाळा पोलीस ठाणे येथे भाग ५ गुरनं. ४७८/१९ भादवि ३९५ प्रमाणे दरोडयाचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच दि. २६/०७/१९ रोजी निंभोरे शिवारात कॅनल लगत फिर्यादी नामे आशिष शहा यांना नवरी मिळे नव-याला या वेब साईटवरुन त्यांना संपर्क करुन त्यांना विश्वासात घेवून माझे बहीणीचे तुमच्या सोबत लग्न करायचे असे सांगून विश्वासात घेवून बोलावून घेवून त्याच्याकडून व त्यांच्या घरच्यांकडून रोख रक्कम, सोन व मोबाईल असे मारहाण करुन जबरदस्तीने लुटुन नेले म्हणून करमाळा पोलीस ठाणे येथे भाग ५ गुरनं. ४९०/१९ भादवि ३९५ प्रमाणे दरोडयाचा गुन्हा दाखल केला आहे. सदरचा गुन्हा दाखल झालेनंतर लागलीच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सो, श्री डॉ. विशाल हिरे , मा. पोलीस निरीक्षक सो, सर्जेराव पाटील, असे घटनास्थळी भेट देवुन गुन्हा उघडकीस आणणेबाबत एक टीम स्थापन करुन त्यांना गुन्हा तात्काळ उघडकीस आणणेबाबत योग्य सुचना दिले. त्यावरुन आम्ही सपोनि वाघमारे, सपोनि तेलतुंबडे, पोकॉ/४८८ साटे, पोकॉ/८०८ चितळे, पोकॉ/११६२ पवार यांनी अतिषय कौशल्यपुर्व तपास करुन सदर टोळीतील ३ आरोपी नामे १) अलबुळया बुट्टया पवार, वय ४८ वर्षे २) लाला काजा काळे, वय ३२ वर्षे, ३) कौशल्या काजा काळे, वय २८ वर्षे रा. साडे ता. करमाळ यांना अटक करुन त्यांच्याकडुन गुन्हयात वापरलेली मोटारसायकल, गुन्हयात लुटलेले २.५ तोळयाची सोन्याची दागीने व तसेच गुन्हयात वापरलेले मोबाईल हस्तगत केलीह आहेत.

अशा प्रकारे लग्नाकरीता मुलगी दाखवितो या बहाण्याने लुटणा-या टोळीचा करमाळा पोलीसांनी पर्दाफाश करुन एक आठवडयात जेरबंद केले आहे. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये सायबर पोलीस ठाणे चे सपोनि रविंद्र गायकवाड व पोकॉ/२२२२ हाटखिळे यांचे विशेष सहकार्य लाभले.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस अधिक्षक सो, श्री मनोज पाटील, मा. अप्पर पोलीस अधिक्षक सो, श्री अतुल झेंडे, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सो, श्री डॉ विशाल हिरे, मा. पोलीस निरीक्षक सो, श्री. सर्जेराव पाटील यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहा. पोलीस निरीक्षक सो, श्री प्रकाश वाघमारे, रविंद्र तेलतुबडे, पो.कॉ/४८८ प्रविण साटे, पो.कॉ/८०८ योगेश चितळे, पो.कॉ/११६२ मनिष पवार, पो.कॉ/१५२१ अभिजीत जगदाळे, पोकॉ/११३० लोंढे यांनी केले आहे.

Scanned by CamScanner